# दिनांक 28/03/2025

**1.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 17:00 वा च्या सुमारास मौजे. वांजले ता. कर्जत येथील फिर्यादी रा. वांजले, ता. कर्जत यांचे राहते घरात कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादी यांचे राहते घराचे बेडरुममध्ये प्रवेश करून तेथील लोखंडी कपाटाचे लॉक तोडून फिर्यादी यांची वहिनी हिचे एकूण 2,40,000/- रुपये व किंमतीचे सोन्याच्या धातुचे गंठण फिर्यादी यांचे संमतीशिवाय घरफोडी करून स्वतःचे फायदया करिता चोरी करुन नेले आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 27/03/2025 रोजी 04:45 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 87/2025, भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 331(3),305 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री गायकवाड हे करीत आहेत.

**2.** नेरळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 17/06/2024 रोजी 13:00 वा ते दि. 27/03/2025 रोजी 13:00 वा च्या दरम्यान आरोपीत व महिला फिर्यादी हे शेजारी शेजारी राहतात आरोपीत याने फिर्यादी यांचेशी प्रेमसंबंध निर्माण करण्याचे उद्देशाने फिर्यादी यांचे घरात जावुन त्यांचेकडे प्रेमसंबंध ठेवण्याकरीता मागणी केली तसेच त्यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून त्यांचेशी लैगिक जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न केला व फिर्यादी यांनी आरोपीत यास प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिला त्या रागाने आरोपीत याने वेळोवेळी फिर्यादी यांचे पती व मुलांना मारण्याच्या धमक्या देवून शिवीगाळी केली.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे गुरनं.54/2025, भा.न्याय संहिता 2023 चे .कलम 74,75 ,352,351(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास माहिला पोलीस उपनिरीक्षक प्राची पांगे ह्या करीत आहेत.

**3.** रोहा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 08:30 वा च्या सुमारास महिला फिर्यादी यांची मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असुन सुध्दा तीला फिर्यादी यांची मुलगी, शाळेला गेली असताना आरोपीत याने वर्गामध्ये शिकवत असताना फिर्यादी यांची मुलगी व तिच्या मैत्रीणी या पाठीमागील बेंचवर बसलेल्या असताना त्यांचे इच्छेविरूध्द पाठीवर हात फिरवून मनामध्ये लज्जा उत्पन्न करून विनयभंग केला. सदर गुन्ह्यातील आरोपी दिनांक व वेळ 27/03/2025 रोजी 22:58 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत रोहा पोलीस ठाणे गुरनं. 63/2025, बाल लै. अत्या. संरक्षण (POCSO) अधिनियम, 2012 चे कलम 8,12 , भारतीय न्याय संहिता 74,79 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री. एस. खतिब हे करीत आहेत.`

**4.** गोरेगांव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/03/2025 रोजी 13:30 वा च्या सुमारास मौजे टेमपाले गावाचे गोवा- मुंबई हायवे , माणगाव येथे मयत मोटार सायकल स्वार यांची नविन हिरो स्पेंलडर प्लस हि लोणेरे ते वडपाले मुंबई -गोवा हायवे रोडने मोटार सायकल स्वत: चालवित जात असतांना मौजे टेमपाले गावच्या हददीत आलेवेळी त्याचे मोटार सायकलला महाड बाजुकडुन मुबई बाजुकडे जाण-या कोणत्यातरी अज्ञात वाहनाने समोरुन ठोकर मारुन अपघात मोटारसायकल स्वार-महेश गणेश मोहिते रा.वडपाले ता-माणगाव यास डोक्यास, तोंडास ,हातापायास लहानमोठया गंभीर स्वरूपाच्या दुखापती होवुन यांचे मरणास अज्ञात वाहनावरील अज्ञात वाहन चालक कारणीभत होवुन अपघाताची खबर न देता व वैदयकीय उपचार न करता पळुन गेला.

याबाबत गोरेगांव पोलीस ठाणे गुरनं. 22/2025 भा.दं.वि.क. 106 , 281,125(a),125(a), , मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184,134 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री सोपान रासक हे करीत आहेत.

**5.** कर्जत पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 03:30 वा च्या सुमारास मौजे- सहयाद्री विला फार्महाउस, आडीवली, ता.कर्जत येथे फिर्यादी यांनी आरोपीत यांचे मोबाईल मधील त्यांचे ग्रुपचे काढलेले फोटो व्हॉट्सअॅपव्दारे घेत असताना चुकुन फिर्यादी यांच्या कडुन आरोपीत यांचे मोबाईलचे गॅलरीतील सर्व फोटोवर क्लीक झाल्याने आरोपीत यांच्या मोबाईलमधील सर्व फोटो फिर्यादी यांचे मोबाईलमध्ये आल्याने त्या गोष्टीचा आरोपीत यास राग आल्याने त्याने फिर्यादी यांना शिवीगाळी करुन प्रथम कमरेला लावण्याच्या बेल्टने फिर्यादी यांना मारहाण केली व त्यानंतर लाकडी बॅटने त्याचे डावे हाताचे कोपरावर व उजव्या हाताचे मधल्या बोटावर,पाठीवर,डोक्यावर,डावे पायाचे टाचेवर व पोटरीवर,उजवे पायाचे गुडग्याचे खालचे भागावर,कमरेवर उजव्या हाताचे खांदयावर त्या बॅटने उपटी मारुन दुखापत केली,व त्यानंतर आरोपीत याने त्यांना हाताबुक्यांनी नाकावर मारुन दुखापत केली व तु भेटशील तेथे तुला जिवे ठार मारीन अशी धमकी दिली तसेच फिर्यादी वापरत असलेला मोटो जी कंपणीचा मोबाईल फोडुन त्याचे नुकसान केले आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाणे गुरनं. 88/2025, भारतीय न्याय संहीता कलम 118(1), 352, 351(2), 115(2) 324(2), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/काठे हे करीत आहेत.

**6.** मांडवा (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 26/03/2025 रोजी 11:00 वा च्या सुमारास मौजे किहीम येथील गट क्र 490 या मिळकतीमध्ये, अलिबाग येथे किहीम येथील गट क्र 490 या मिळकतीचे देखरेखीचे फिर्यादी हे काम करीत आहेत आरोपीत रा. मांडवा हे व त्याच्यासोबत

इतर 20 ते 25 लोक 4 व्हिलर गाडया घेउन फिर्यादी यांच्या मालकाच्या ताब्यातील मिळकतीमध्ये विनापरवाना प्रवेश करून फिर्यादी व त्यांचे कुंटुबातील यांना धक्काबुक्की करून असभ्य वर्तन करून शांतता भंग करून त्याचे घरातील सामान बाहेर काढुन फेकुन दिले.

याबाबत मांडवा (सागरी) पोलीस ठाणे गुरनं. 41/2025, भारतिय न्याय संहिता 2023 चे कलम 329(3) ,115(2), 352 ,324(4) ,189(1) ,190, 191(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री खोत  हे करीत आहेत.

**7.** पेण पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/03/2025 रोजी 06:00 वा च्या सुमारास मौजे वाहतुक चौकी महामार्ग पेण रोडवर ता. पेण येथे आरोपीत रा महाजने पो. मल्याण ता अलिबाग याने त्याचे ताब्यातील टेम्पो क्र. एम एच 06 सी पी 0859 यामध्ये एकूण 10,60,000/- रुपये व किंमतीचे खिलार जातीचे बैल वाहतुक करण्यापुवी जनावरांचे स्वास्थाबाबत पशु वैदयकीय अधिकारी यांचेकडुन तपासणी करुन न घेता तसेच जनावराचे वाहतुकीबाबत परिवहन अधिकारी यांचेकडुन वाहतुक परवाना न घेता तसेच जनावरांचे चारापाण्याची व्यवस्था न करता जनावरांची वाहतुक करताना मिळुन आला.

याबाबत पेण पोलीस ठाणे गुरनं. 56/2025इतर भाग 6, प्राणी क्लेश प्रतितबंध कायदा 1960 चे कलम पशु वाहतुक अधिनीयम 1978 11(1),47 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई घोलप  हे करीत आहेत.

# दारूबंदी केसेस

**1.** दिधी (सागरी) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 27/03/2025 रोजी 21:30 वा च्या सुमारास पोलिसांना मिळालेल्या गोपनीय महितीनूसार मौजे दिघी जेटटी येथे, श्रीवर्धन येथे आरोपीत व त्याचे मोटारसायकल चे पाठीमागे बसलेले यांनी एकूण 1,24,000/- रुपये व किंमतीची गावठी हातभटटीची तयार दारू विनापरवाना, गैरकायदा, आपले ताबे कब्जात बाळगून मोटार सायकल वाहन क्रमांक एम. एच. 06 सी. एफ. 6537 ने मुरूड येथून दिघी जंगल जेटटीतून वाहतूक करीत असताना दिघी जेटटी येथे मिळुन आले.

याबाबत दिधी (सागरी) पोलीस ठाणे येथे गु.र.नं. 21/2025दारूबंदी अधिनियम, 1949, इतर, दारूबंदी अधिनियम, 1949 चे कलम 65(e), (c), 82, 83 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोना/कुथे हे करीत आहेत.

# वाहतूक केसेस

दिनांक 27.03.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 264 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून  2,47,000/-रुपये इतका दंड आकारला आहे.